ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २७ फेब्रुवारी, १९५२ अंक ९

# वि वि ध मा हि ती

**कापडाची सहकारी गिरणी**—पाकिस्तानमधील अटक जिल्ह्यांत कापडाची एक सहकारी गिरणी लवकरच उभारण्यांत येणार आहे. गिरणीचें अधिकृत भांडवल १ कोटी रुपये असेल. ३० लाख रुपये किंमतीची यंत्रसामुग्री पाकिस्तानला एका महिन्याच्या आंत मिळेल. गिरणींत ५,१४४ चात्या बसविण्यांत येतील.

**मुंबई राज्यांतील खनिज संपत्ति**—जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआनें मुंबई राज्यांतील खनिज संपत्तीची कल्पना देणारें एक चोपडें तयार केलें असून मुंबई सरकारच्या विकास खात्या-तर्फे तें प्रकाशित करण्यांत आलें आहे. राज्यांतील खनिजांची सद्यःपरिस्थिति व त्यांच्या संशोधनाची दिशा, इत्यादि दृष्टीनें पुस्तिकेंत माहिती देण्यांत आली आहे. मुंबई राज्यांत विलीन झालेल्या संस्थानांचाहि त्यांत समावेश करण्यांत आला आहे.

**राजस्थानमधील स्थानिक स्वराज्य**—राजस्थान सरकारनें राज्यांत चालू असलेला स्थानिक-स्वराज्य संस्थांचा कायदा दुरुस्त करून संस्थांच्या निवडणुका प्रौढ-मतदान पद्धतीनें व्हाव्या अशी सोय केली आहे. २१ वर्षें पूर्ण झालेल्या सर्वांना मताधिकार देण्यांत आला आहे. राज्यांत १४७ नगरपालिका आहेत.

**जमखिंडीजवळ नवा पूल**— जमखिंडीजवळ कृष्णा नदीवर एक नवा पूल बांधण्याचें मुंबई सरकारनें ठरविल्याचें समजतें. हा पूल पुरा झाल्यावर विजापूर व जमखिंडीमधील प्रवासाचें अंतर बरेंच कमी ( ४० मैल ) होईल. सध्यां विजापूरहून जमखिंडीला कोल्हापूरमार्गें जावें लागून ६४ मैल अंतर तोडावें लागतें. नवीन पुलाची लांबी १,५४२ फूट आणि रुंदी २० फूट राहील. खर्च सुमारें ९८,७४,००० रुपये येईल.

**अणूवरील रशिअन फिल्म**— मॉस्कोमधील शास्त्रीय चित्रपट तयार करणारी संस्था अणूंबंधी एक चित्रपट तयार करीत असल्याचें समजतें. रशिआच्या पदार्थ-विज्ञान शास्त्रज्ञांनीं शोधून काढलेल्या एका अभिनव पद्धतीनें चित्रीकरण करण्यांत येणार आहे. लेनिनग्रॅड येथील सिनेतंत्रज्ञ चित्रीकरणांत सहकार्य करणार आहेत.

**अब्राहम लिंकनच्या पत्रांची किंमत**—अब्राहम लिंकन ह्यांनीं आपल्या मित्रांना लिहिलेल्या स्वतःच्या अक्षरांतील १४ पत्रांचा नुकताच एक लिलांव न्यूयॉर्क येथें झाला. १४ पत्रांची मिळून १५,००० डॉलर्स इतकी भारी किंमत आली.

**ऐनजिनसी वस्तूंचा व्यापार**— इजिप्तच्या मंत्रिमंडळानें आपल्या देशाचा कापूस देऊन त्याच्या बदला परकीय देशां-कडून गहू आणि साखर आयात करण्याचें ठरविलें आहे. ह्यासंबंधीं लवकरच बोलणीं सुरू करण्यांत येणार आहेत. देशांतील रहाणीचा भरमसाट खर्च कमी करण्यासाठी उपाययोजनाहि करण्याचें ठरलें आहे.

**भारतीय मच्छीमारी**—भारतीय मच्छीमारीच्या धंद्यांत दर वर्षी सरासरी ५,५०,००० टन मासे पकडले जातात, असा अंदाज करण्यांत आला आहे. त्यापैकीं ४३ टक्के मासे खाण्यांत येतात. भारतांत दरवर्षी १,५००,००० पौंड शार्क लिव्हर ऑईल तयार करण्यांत येतें. दरवर्षी २,१४५ टन डबाबंद माशांची आयात करण्यांत येते.

**राजस्थानांत मँगेनीझ**— राजस्थानमधील झालोद्यापासून १०० मैलांवर मँगेनीझ आणि ग्रॅफाइट हीं खनिजें सांपडल्याचें वृत्त आहे. त्याशिवाय सोप-स्टोन, गॅलिअम आणि तांबें हीं खनिजेंही सापडण्याचा बराच संभव आहे असें समजतें. ह्या भागांत बऱ्याच उद्योगपतींनीं खाणी उघडण्यासाठी जमिनी खरेदी केल्या आहेत.

**रेल्वेच्या ताब्यांतील कोळशाच्या खाणी**— सध्या ज्या कोळशाच्या खाणी रेल्वेकडून चालविल्या जातात त्या चालविण्या-साठी सिंद्रीच्या कारखान्याच्या बोर्डाच्या धर्तीवर एक खाजगी मर्यादित भांडवलाची कंपनी काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. ह्या खाणींच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी सरकारनें एक कमिटी नेमली होती. तिच्या शिफारसीप्रमाणें वरील निर्णय घेण्यांत आला आहे.

**इराणशीं रेडिओ टेलिफोनचें दळणवळण**— १ मार्च, १९५२ पासून भारत आणि इराण ह्यांच्या दरम्यान रेडिओ-टेलिफोनचें दळणवळण सुरू करण्यांत येणार आहे. भारताचें लंडन, इंडोनेशिआ आणि इजिप्त ह्यांचेशीं अशा प्रकारचें दळणवळण ह्यापूर्वीच चालू झालें आहे.

**गिऱ्हाइकांना नफ्यांतील वांटा**— ब्रिटनमधील पुठ्ठ्याच्या पेट्या तयार करणाऱ्या एका कंपनीनें खूप नफा मिळाला म्हणून आपल्या गिऱ्हाइकांना ४०,००० पौंड परत केले. कच्च्या मालाच्या किंमती फार चढतील, ह्या अपेक्षेनें कंपनीनें आपल्या मालाच्या किंमती चढविल्या होत्या. परंतु नंतर कच्चा माल स्वस्त मिळाल्यामुळें कंपनीस चांगलाच नफा झाला.



# टाटा ॲग्रिको
## अ व जा रें


**अधिक धान्य पिकविण्यास त्यास साह्य करतात**

मजबूत, टिकाऊ व वापरण्यास सुलभ अशीं ॲग्रिको अवजारें देशांत सर्वत्र शेतकरी प्रथम पसंत करतात—सफल शेतीसाठीं तीं अत्यावश्यक प्राथमिक साधनें होत.


शेतीच्या हरएक कामासाठीं उपयुक्त असें ॲग्रिको अवजार मिळूं शकतें



**पावडीं :**
निरनिराळ्या परिस्थितींत काम करण्यासाठीं सुयोग्य असे पांच नमुने. इतर सर्व ॲग्रिको अवजारांप्रमाणेंच उंची कार्बन पोलादी पत्र्यांपासून बनविलेलीं व पाणी दिलेलीं असतात व त्यांना पक्के लाकडी दांडे बसविलेले असतात.



**फावडीं :**
सुविख्यात स्वान-नेक सह तीन निरनिराळे नमुने. त्यांना तीक्ष्ण धार असल्यानें तीं साधीनें कामाची कार्यक्षमता वाढवितात. समतोल रचनेमुळें तीं वापरणें सुद्धां अत्यंत सुकर असतें.



**पिकास व बीटर्स :**
निरनिराळ्या प्रकारचीं कामें करण्यासाठीं चार प्रमुख नमुने. धार बरेच दिवस टिकावी म्हणून त्यांचीं टोकें मुद्दाम विशेष मजबूत बनविलेलीं असतात. अत्यंत दणकट व दिर्घकाल टिकतात.

## टाटा ॲग्रिको अ व जा रें

दि टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लि.
सेल्स ऑफिस : २३-बी, नेताजी सुभाष रोड, कलकत्ता.
शाखा : मुंबई, मद्रास, नागपूर, अहमदाबाद, कानपूर, सिकंदराबाद, विजयनगरम् कॅंटनमेंट व जलंदर कॅंटनमेंट.


X·2m, N35
J2
162626

# अर्थ

बुधवार, ता. २७ फेब्रुवारी, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदच्या स्टर्लिंग कर्जाचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटला !

हिंदच्या स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीच्या प्रश्नाबद्दल मि. चर्चिल ब्रिटनमध्यें अधिकारारूढ झाल्यापासून कांहींशी चिंता वाटत होती. परंतु मि. बटलर व हिंदचे अर्थमंत्री यांच्या दरम्यान नुकत्याच झालेल्या वाटाघाटी व पत्रव्यवहार यांवरून हा प्रश्न सुटला असें दिसतें. ता. ८ फेब्रुवारी रोजीं हिंदची स्टर्लिंग शिल्लक रु. ७६१ कोटी असून स्वातंत्र्य मिळालें तेव्हां ती रु. १५१६ कोटी होती. नवीन झालेल्या कराराप्रमाणें पौंडाच्या भाषेंत आज स्टर्लिंग शिल्लक ५७ कोटी पौंड आहे. यापैकीं ३१ कोटी पौंड रक्कम नंबर दोनच्या ब्लॉक खात्यांतून नंबर एकच्या खात्यांत वर्ग करण्यांत येऊन ती यापुढें चलनासाठी एक प्रकारचा आधार म्हणून लंडनमध्यें राहील. बाकीची रक्कम वर्षाला साडेतीन कोटी पौंड याप्रमाणें १९५७ जून अखेरपर्यंतच्या एकूण सहा वर्षांत चालू व्यापारी खर्चासाठी युक्त करण्यांत येईल. कांहीं झालें तरी नंबर एकच्या चालू खात्यांतील शिल्लक ३४ कोटी पौंडांहून कमी होणार नाहीं, ही दक्षता बाळगण्यांत येईल. कदाचित् जरूर लागली तर एखाद्या वर्षी विचारविनिमय करून अर्धा कोटी पौंडांची अधिक उचल करतां येईल. वरीलप्रमाणें जून, १९५७ अखेरपर्यंत खर्च होऊन नंबर २ च्या ब्लॉक केलेल्या खात्यांत कदाचित २ कोटी पौंडांची शिल्लक राहिल्यास ती त्यानंतर ताबडतोब नं. १ च्या चालू खात्यांत वर्ग केली जाईल. १९५० सालीं सप्टेंबरमध्यें राष्ट्रकुटुंबांतील अर्थमंत्र्यांच्या चर्चेत झालेला, दुर्मीळ चलनाच्या देशांशीं होणाऱ्या व्यापाराबद्दलचा निर्णय बंधनकारक राहील; परंतु ब्रिटन व हिंद यांमधल्या वाटाघाटींनें त्याचें स्वरूप कदाचित् किंचित् बदलताहि येईल.

आजच्या परिस्थितींत स्टर्लिंग शिलकेबद्दल झालेला वरील करार बराच समाधानकारक समजला पाहिजे. कारण, गेल्या चार-पांच वर्षांत हिंदची राजकीय व आर्थिक परिस्थिति ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील संबंधाच्या दृष्टीनें बरीच बदलली आहे. अमेरिकाहि हिंदला निर्हेतुक मनानें आर्थिक मदत करावयास तयार आहे हें अमेरिकेचे प्रतिनिधी मि. बाउल्स यांनीं अलिकडे केलेल्या भाषणांवरून व आर्थिक मदतीच्या करारावरून स्पष्ट झालें आहे. स्टर्लिंग शिलकेच्या परतफेडीचा करार सामान्यपणें समाधानकारक असला तरी हिंदचा खरा फायदा पौंडाच्या पतीवरच अवलंबून राहाणार आहे. गेल्या वर्षी पौंडाची किंमत वाढवावी व तो मजबूत करावा अशी भाषा बोलली जात होती, परंतु अलिकडे पुन्हां पौंडाची किंमत कमी करावी कीं काय अशा अर्थाची भाषा बोलली जात आहे. स्टर्लिंग शिल्लक पौंडांत असल्यामुळें पौंडाच्या बाह्य किंमतीवरच, म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारांतील त्याच्या स्थानावरच, पर्यायानें आपल्या स्टर्लिंग शिलकेची खरी किंमत अवलंबून आहे. तेव्हां स्टर्लिंग गटाच्या कक्षेतील राष्ट्रांच्या आर्थिक मजबुतीवरच पर्यायानें हिंदच्या स्टर्लिंग शिलकेची मदार अवलंबून आहे. नवीन करारानें, हिंदचा सुवर्णसाठा चलनाला आधार म्हणून वाढविण्यांत यावा म्हणजेच स्टर्लिंग शिलकेच्या कांहीं भागाचें सोन्यांत रूपांतर केलें जावें या मागणीचा विचार केलेला नाहीं. तरीपण स्टर्लिंग गटाच्या मजबुतीवर हिंदच्या शिलकेचा उपयोग अवलंबून राहाणार आहे हें योग्यच समजलें पाहिजे.

---

## कंपन्यांच्या भांडवल उभारणीवरील निर्बंध

### कायद्याची मुदत चार वर्षांनीं वाढली

भांडवल उभारणीवरील निर्बंधांच्या कायद्याची मुदत ३१ मार्च, १९५२ अखेर संपत होती, ती ३१ मार्च, १९५६ अखेर, म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत वाढविण्यांत येणारें बिल पार्लमेंटानें नुकतेंच मंजूर केलें. जें भांडवल उपलब्ध आहे, तें जरूर नसलेल्या योजनांत गुंतलें जाऊं नये आणि सरकारी धोरणाच्या विरुद्ध त्याची गुंतवणूक होऊं नये, हा प्रस्तुत निर्बंधांचा उद्देश होता. भांडवलाची टंचाई लक्षांत घेतली, तर निर्बंध ज्या कारणांसाठी घालण्यांत आले, तीं कारणें अद्याप कायमच आहेत. योग्य त्या उपक्रमांकडे पैशाचा ओघ वळावा, ह्या दृष्टीनें गुंतवणुकीवर निर्बंध पक्के करावे, अशी प्लॅनिंग कमिशनचीहि शिफारस होती. इंडस्ट्रिअल ( डेव्हलपमेंट अँड रेग्युलेशन ) अॅक्ट, १९५१ नें बऱ्याच उद्योगधंद्यांच्या नियंत्रणाचा अधिकार सरकारला दिला आहे, परंतु सर्व क्षेत्रांतील भांडवल उभारणीवर नियंत्रण ठेवता येण्याइतका तो अधिकार व्यापक नाहीं. भरमसाटपणें लोक कंपन्या काढीत होते, त्यावेळीं भांडवल उभारणीवर नियंत्रण ठेवणें इष्ट होतें; आतां नवी कंपनी क्वचितच निघते. मग, नियंत्रणाच्या मुदतवाढीची आवश्यकता आहे कोठें ? ह्या आक्षेपास पार्लमेंटांत उत्तर देतांना अर्थमंत्री श्री. देशमुख म्हणाले, कीं ज्यावेळीं भरपूर भांडवल होतें त्यावेळेपेक्षां आतां त्याच्या टंचाईच्या काळांत नियंत्रण ज्यास्तच आवश्यक झालें आहे. केवळ निष्काळजी व बेपर्वाई लोकांचाच विचार पूर्वी सरकारला करावा लागे; आतां सबंध राष्ट्राच्या हितास प्राधान्य द्यावयास हवें; आणि व्यक्तींच्या हितसंबंधांपेक्षां राष्ट्राचे हितसंबंध कितीतरी पटींनें ज्यास्त महत्त्वाचे असतात. भांडवल उभारणीवर घातलेल्या निर्बंधामुळें बरेच देशी व विदेशी भांडवलदार बिचकून गेले, असें घडलेलें नाहीं. विदेशी भांडवलदारांना तर उत्तेजन देण्याचें सरकारचें धोरण आहे; त्यांचें भांडवल त्यांना पौंडी व डॉलर्सच्या गटांत परत नेता येईल अशी आश्वासनेंहि सरकारनें दिलीं आहेत. कांहीं महिन्यांपूर्वीच तीन मोठ्या पेट्रोल कंपन्यांनीं भारतांत भांडवल गुंतविण्याचें मान्य केलें आहे. त्या कंपन्यांच्या मानानें तें भांडवल फार मोठें नसलें, तरी आपल्याला तें प्रचंड वाटेल. थोडक्यांत म्हणजे, भांडवल उभारणीवरील नियंत्रणाचा परिणाम उपकारकच झालेला आहे, असें म्हणता येईल.

## रेल्वेचें अंदाजपत्रक व कारभाराची परिस्थिति

१९५२-५३ चें रेल्वेचें अंदाजपत्रक ता. २२ फेब्रुवारी रोजीं रेल्वेमंत्री श्री. गोपालस्वामी अय्यंगार यांनीं पार्लमेंटला सादर केलें. पुढील वर्षी २५ कोटी रुपये शिल्लक दाखविणारें हें अंदाजपत्रक आहे. नवीन पार्लमेंट अस्तित्वांत येणार असल्यामुळें चार महिन्यांच्या खर्चापुरेशी मान्यता देण्यांत येणार आहे.

चालू सालचा १९५१-५२ चा उत्पन्नाचा अंदाज २७९ कोटी रुपये होता, परंतु मालाची वाहातूक वाढल्यामुळें दुरुस्त अंदाज २८८ कोटींचा आहे. महागाई भत्त्यांत जून १९५१ पासून दरमहा रु. ५ वाढ झाल्यामुळें, खर्चाच्या बाबतींतहि १८७ कोटी रुपयांच्या अंदाजाऐवजीं १९६ कोटी रु. खर्ची पडतील. गेल्या वर्षी म्हणजे १९५०-५१ सालीं १४ कोटी २४ लक्ष रु. शिल्लक राहातील असा अंदाज होता, त्याऐवजीं १५ कोटी १ लक्ष रुपये उरले. चालू वर्षी ३३ कोटी रुपये, रेल्वेंत गुंतविलेल्या भांडवलावर खर्ची पडून निव्वळ शिल्लक २२ कोटी रुपये राहील व पुढील वर्षी २५ कोटी रु. निव्वळ शिल्लक राहील.

१९५२-५३ वर्षी कोळशाच्या वाहातुकीवर ३० टक्के वाढ करण्यांत येईल. वास्तविक कोळशाच्या बाबतींतल्या वर्किंग कमिटीनें या वाहातुकींत १०० टक्के वाढ सुचविली होती. या वाढीमुळें रेल्वेच्या उत्पन्नांत ६ कोटी रु. वाढ होईल. त्यापैकीं २ कोटी ४० लक्ष रु. इतकी किंमत रेल्वेला लागणाऱ्या कोळशाच्या वाहतुकीवरच होणार असल्यामुळें रेल्वेला सहन करावी लागणार आहे. बाकीची ३ कोटी ६० लक्ष रु. वाढ कोळशाच्या इतर ग्राहकांना सहन करावी लागेल. याशिवाय अन्नधान्यें, गळिताचीं धान्यें, लोखंड व पोलाद यांच्या वाहातुकींच्या दरांत जरूर ते फरक करण्यांत येऊन उत्पन्नांत २ कोटी ९० लक्ष रुपयांची पुढील वर्षी वाढ होईल.

दरांच्या या फेरबदलाचा उद्देश सर्व ठिकाणीं एकसूत्रीपणा निर्माण करणें हा आहे. उतारूंच्या वाहातुकीच्या बाबतींतहि सपाट भागांतील व उंच टेकड्यावरील कांहीं भागांत दर जास्त आहे. तो सर्व ठिकाणीं सारखा केल्यास २ कोटी रुपयांनीं उतारूंचें उत्पन्न कमी येईल, व याबाबतींत फरक सपाट भागांतील रेल्वेच्या वाहातुकीच्या दरांत पुढील वर्षी सुचविण्यांत आला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळांत रेल्वेच्या कारभाराची जमाखर्चाच्या दृष्टीनें निश्चित प्रगति होत आहे असें रेल्वेमंत्र्यांनीं सांगितलें. रेल्वे बोर्डाची गेल्या वर्षी करण्यांत आलेली पुनर्घटना व सर्व रेल्वेजचे नवीन सहा झोन्स करण्याची योजना या गोष्टीहि चांगल्या आहेत असेंहि ते म्हणाले. अंदाजपत्रकाला जोडलेल्या श्वेतपत्रिकेंत पुढील माहिती आढळते. रेल्वेचा खर्च व पुनर्रचनेचा भांडवली खर्च वाढत असला तरी एकंदर उत्पन्न या वाढत्या खर्चापेक्षांहि वाढत आहे. वरच्या वर्गांतील उतारूंची संख्या वाढलेल्या दरामुळें थोडी कमी झाली आहे परंतु तिसऱ्या वर्गाच्या उतारूंत वाढत्या दरामुळें घट त्या मानानें बरीच कमी झाली. चालू वर्षी सैन्याच्या हालचाली व निवडणुकी यांमुळें उत्पन्न वाढण्यास मदत झाली. वाढतें औद्योगिक उत्पादन, धान्याची वाढती आयात व हिंद-पाक यांमधील सुधारलेले व्यापारी संबंध यांमुळें माल-वाहातुकीचें उत्पन्न वाढावयास मदत झाली. या सर्व कारणांमुळें चालू वर्षी उत्पन्न अंदाजापेक्षां ८ कोटी ५६ लक्ष रुपयांनीं वाढून एकूण २८८ कोटी रुपये होणार आहे. पुढील वर्षी उतारूंची संख्या जरी किंचित् कमी झाली तरी माल-वाहातुकीच्या दरांतील वाढ व सुधारणा यांमुळें उत्पन्न दहा कोटी रुपयांनीं वाढणार आहे. पुढील वर्षी खर्चात होणारी वाढ, वाढता महागाई भत्ता, धान्य व स्टोअर्स यांवरील वाढता खर्च यांमुळें होणार आहे. ही वाढ सात कोटी रुपयांची आहे. पुढील वर्षी भांडवली खर्च व रेल्वेच्या पुनर्रचनेच्या योजना यांसाठीं ७५ कोटी रु. खर्ची पडतील. रेल्वेला लागणारे उतारूंचे डबे व मालाच्या वॅगन्स यांचें देशांतील अंतर्गत उत्पादन वाढविलें जाईल व परदेशांतून आयातहि जरूर त्या प्रमाणांत केली जाईल. पेरंबूर येथील कारखाना १९५४ मध्यें पूर्णावस्थेस पोंचला म्हणजे तो कारखाना व हिंदुस्थान एअर क्राफ्ट कारखाना या दोहोंतून वर्षाला लागणारे ६०० उतारूंचे डबे देशांत तयार होतील. चित्तरंजन व टेलूको या कारखान्यांची इंजिनांची उत्पादनक्षमता वर्षाला २२० असेल. परंतु चालूं वर्षी या दोन कारखान्यांतून ४० इंजिने तयार होतील. रेल्वेची इंजिनांची वार्षिक मागणी २०० इंजिनांची आहे. कारखाने व रेल्वेचे यार्डस् यांमध्यें उतारूंचे डबे व मालाच्या वॅगन्स शक्य तितका कमी वेळ पडून राहाण्याबद्दल ' एफिशन्सी बरो ' तर्फे दक्षता बाळगली जाते. रेल्वेच्या रस्त्यांची दुरुस्ती करणें, पुनर्रचना करणें, व वाढत जाणाऱ्या उतारू व माल वाहतुकीची तरतूद करणें हे खात्यापुढील महत्त्वाचे प्रश्न आहेत. १ एप्रिल १९५१ रोजीं १६४० इंजिनें, ५१२० उतारूंचे डबे, व २५ हजार वहातुकीच्या वॅगन्स बदलावयास पाहिजे होत्या. यावरून संपूर्ण पुनर्रचनेचें काम किती मोठें आहे याची कल्पना येईल. १९४९-५०, १९५०-५१, व १९५१-५२ या तीन वर्षी रेल्वेचा भांडवली खर्च अनुक्रमें ३१ कोटी, ३२ कोटी व ५३ कोटी रु. याप्रमाणें झाला व पुढील वर्षी ५८ कोटी रु. होणार आहे.

वरील सर्व माहितीवरून रेल्वेचा कारभार गेलीं चार वर्षे सुधारत असल्याचें दिसतें. परंतु ही सुधारणा होतांना गेल्या दोन वर्षांत उतारूंचे दर व माल वाहातुकीचे दर यांत वाढ झाल्यामुळेंच कारभाराची सुधारणा दिसून येते. १९४९-५० पासून रेल्वेचें उत्पन्न एकंदर ६२ कोटींनी वाढलें असून कारभाराचा खर्च २१ कोटी रुपयांनीं वाढला आहे. या वाढत्या खर्चाबरोबरच १९४९-५० सालीं घसारा-निधींत ११ कोटी ५० लक्ष रुपये जमा करण्यांत आले होते तर १९५२-५३ सालीं ३० कोटी रु. जमा केले जातील. भांडवलावरील व्याज १९४९-५० सालीं ५·१ टक्के होतें तें १९५१-५२ सालीं ६·५ टक्के झालें असून पुढील वर्षी ६·८ टक्के होणार आहे. गेल्या वर्षापासून उतारूंच्या दरांत वाढ करून भांडवली खर्चाची तरतूद करण्याची सुरू करण्यांत आलेली प्रथा कांहींच्या मतें बरोबर नाहीं. आजची रेल्वेखात्याची सुस्थिति वाढत्या उतारूंच्या दरांमुळें आहे व यापुढें कोळसा इ. बाबतींत माल वाहातुकीचे दरहि वाढणार आहेत. गेल्या चार वर्षांत पुनर्रचनेच्या कार्यावर १४४ कोटी रुपये खर्च करून व भांडवलावरील व्याजाची योग्य ती तरतूद करून व घसारा फंडांतहि सढळ रक्कम टाकून रेल्वेखात्यानें आपला रिझर्व्ह फंड ४१ कोटी रुपयांनीं वाढविला आहे. पुढील वर्षी रेल्वेच्या विकास फंडांत १२ कोटी जमा होणार आहेत व सुमारें १३ कोटी रिझर्व्ह फंडांत जमा होतील. सुधारलेल्या रेल्वेच्या आर्थिक कारभारानें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सुखसोई व वाहातुकीच्या दरांत कपात या गोष्टींकडे विशेष लक्ष देणें बरें. रेल्वे रस्तेहि वाढविणें आवश्यक दिसतें.

### स्टर्लिंग गटांतील देशांच्या मजबुतीची आवश्यकता

ब्रिटनचे अर्थमंत्रि मि. बटलर यांनीं नुकतेंच अँग्लो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स समोर भाषण केलें. स्टर्लिंग गटांतील देशांवरील संकट सोडविणें हें परस्पर सहकारावर अवलंबून राहील. मात्र प्रत्येक देशाच्या कर्तृत्वानुसार त्या देशानें या संकटाला तोंड देण्यांत आपला वांटा उचलला पाहिजे. परंतु या बाबतींत खुद्द ब्रिटनवरील जबाबदारी विशेष आहे. कारण स्टर्लिंग गटांतील देशांमध्यें ब्रिटन हें सर्वांत आर्थिक दृष्ट्या श्रेष्ठ व बाकीच्या गटांतील देशांचे बँकर म्हणून प्रसिद्ध आहे. स्टर्लिंग गटांतील कमकुवत देशांना मोबदला मिळाल्याशिवाय सोनें व डॉलर यांचा सांठा निर्माण करतां येणार नाहीं. यासाठीं ब्रिटनकडूनहि निर्यात होण्याची जरुरी आहे. डॉलर टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी या गटांतील देशांनीं इतर सभासद-देशांशींहि अनुकूल तफावत दर्शविणारा परराष्ट्रीय व्यापार ठेवला पाहिजे. स्टर्लिंग गटांतील देशांच्या दृष्टीनें व सर्व जगाच्याहि दृष्टीनें स्टर्लिंग गटांतील देशांनीं आर्थिक दृष्ट्या मजबूत राहाणें आवश्यक आहे. अमेरिकेच्या मागणीचें स्थिर स्वरूप राहाणें स्टर्लिंग गटांतील देशांच्या दृष्टीनें इष्ट गोष्ट आहे व हें साधण्यासाठीं प्रत्येक सभासद-देशानें अंतर्गत उत्पादन वाढविलें पाहिजे.

---

### ब्रिटनमधील आजचें आर्थिक अरिष्ट कसें टळेल?

ब्रिटनवर सध्यां ओढवलेल्या आर्थिक संकटाबद्दल ब्रिटनमध्यें विरोधी पक्षांत निरनिराळे मतप्रवाह दिसून येतात. या विरोधी लोकांच्या मतें, सरकारनें चिंता निर्माण केली आहे व सरकारचें धोरण अस्पष्ट व वास्तववादाला सोडून आहे. ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाला बाकीच्या जगाकडे जास्त जास्त प्रमाणांत यापुढें निर्गत करावी लागेल. असें करण्यासाठी लोकांनीं जास्त काम केलें पाहिजे व कष्ट केले पाहिजेत. जास्त श्रम करून तेवढ्याच प्रमाणांत जास्त मोबदला मिळेल असेंहि नाहीं. कारण सर्व जादा उत्पन्न परदेशांकडेच रवाना करावें लागेल. जर जादा उत्पन्न स्वदेशांत खर्च केलें तर त्यामुळें आजच्या प्रमाणेंच सोनें परदेशांत जात राहील. यासाठीं कांहीं दिवस तरी लोकांना राहाणीचें मान उतरावें लागेल व कदाचित् पुढें कांहीं दिवस हें राहाणीचें मान जास्त कष्टाचेंच राहील. चलनविस्तारामुळें वाढत जाणारें किंमतींचें मान रोखून धरण्यासाठीं सरकारला कदाचित मजुरीचे दरहि गोठवावे लागतील. अशा तऱ्हेचें वास्तववादी धोरण स्वीकारावें लागल्यास त्यांत चुकीचें कांहीं नाहीं, असें विरोधकांच्या मुद्याला उत्तर देतां येईल. कारण अशाच उपायांनीं आजचें संकट रोखून धरतां येईल व अशा प्रकारच्या उपायांव्यतिरिक्त सध्यांचें आर्थिक अरिष्ट टळणार नाहीं.

---

### हॅरोल्ड लॉइडचा दावा

"सेफ्टी लास्ट" ही हॅरोल्ड लॉइडची जुनी फिल्म टेलिव्हिजनवर दाखविल्याबद्दल त्या अमेरिकन विनोदी नटानें ३,००,००० डॉलर्स नुकसान भरपाई मिळण्यासाठीं दावा लावला आहे.

---

**बलुचिस्तानांत तेलाचा सांठा**— बलुचिस्तानांत तेलाचा शोध करण्यासाठीं गेल्या ऑक्टोबरपासून प्रयत्न सुरू झाले. ह्या प्रयत्नांत ५,८०० फूट खोल खणण्यांत आल्यावर आतां भूमींतील वायू बाहेर पडूं लागले आहेत. त्यावरून तेल सांपडेल असा अंदाज करण्यांत येत आहे.

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.** (स्थापना १९१८)

शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

३, ५, १० वर्षें सिल्व्हर ज्युबिली सर्टिफिकिटें दर ९३-८, ८७-८, ७५ अनुक्रमें.
हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

### डायरेक्टरांचा अहवाल

१९५१ सालीं नोकरवर्गास बोनस देण्यासाठीं केलेल्या तरतुदीची रक्कम रुपये १२,००० व इन्व्हेस्टमेंटसच्या विक्रींत आलेला तोटा रु. ७७,९२४-१-९ वजा जातां बँकेस तिच्या व्यवहारांत नक्त नफा रु. २,३९,६५०-२-६ इतका झाला. त्यामध्यें गेल्या वर्षाची बाकी रुपये ५३,१९९-८-५ जमा केल्यानंतर एकंदर रुपय २,९२,८४९-१०-११ इतकी रक्कम वांटण्याकरितां हातीं राहते. या रकमेची वांटणी खालीलप्रमाणें व्हावी अशी संचालकांची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| बँकिंग कंपनीज ॲक्टला अनुसरून रिझर्व्ह फंडांत जमा करणें | रु. ४८,०००—०—० |
| (सदर फंड आतां रु. ५,१५,००० इतका होईल.) | |
| चालू वर्षाचा इनकम-सुपर टॅक्स | १,१०,०००—०—० |
| दिनांक ३१-१२-५१ ला संपूर्ण होणाऱ्या वर्षासाठीं ६४,००० भागांवर वसूल रकमेवर करमाफ द. सा. द. शें. ५ टक्के प्रमाणें डिव्हिडंड देण्यासाठीं | ८०,०००—०—० |
| पुढील वर्षाच्या नफ्यांत मिळविणेसाठीं | ५४,८४९-१०-११ |
| | रु. २,९२,८४९-१०-११ |

अहवालाचे वर्षी बँकेचे व्यवहार समाधानकारक झाले. ठेवींचें प्रमाण नेहमीं प्रमाणेंच वाढतें आहे. बँक-रेट वाढल्यामुळें सरकारी कर्जरोख्यांचे बाजारभाव बरेच घटले आहेत. पण बँकेच्या इनव्हेस्टमेंटसमधील कर्जरोखे बव्हंशीं अल्प किंवा मध्यम मुदतीचे असल्यामुळें त्यांच्या परतफेडीच्या मुदतीच्या वेळीं त्यांची परत मिळणारी किंमत लक्षांत घेतां या बाबतींत प्रत्यक्षांत तोटा येण्याचें कारण नाहीं. शिवाय, अनपेक्षित अडचणींसाठीं योग्य ती तरतूद केलेली आहे. बँकेच्या इमारतीचें बांधकामांत कांहीं कारणांमुळें समाधानकारक प्रगति होऊं शकली नाहीं.

अहवालाचे वर्षी संचालक मंडळानें बँकेचे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग यांस बँकिंगच्या उच्च अभ्यासासाठीं युनायटेड किंगडम् व युरोपला पाठविलें होतें. त्यांनीं तेथें मिळविलेल्या ज्ञानाचा व बहुमोल अनुभवाचा फायदा बँकेस मिळेल. श्री. जोग हे इंग्लंडमध्यें असतांना इंस्टिट्यूट ऑफ बँकर्स, लंडन च्या संस्थेचे फेलो म्हणून निवडले गेले. पॅरीस येथें भरलेल्या इंटरनॅशनल बँकिंग समर स्कूलला ते उपस्थित राहिले होते. श्री. जोग यांस या बाबतींत मिडलंड बँक लि. चे लंडन शाखेनें सर्व प्रकारचें साहाय्य दिलें.

अहवालाचे वर्षी बँकेची सांगली येथें एक व अमरावती येथें एक अशा दोन नवीन शाखा उघडण्यांत आल्या. दोन्ही त्यांची प्रगति समाधानकारकपणें चालू आहे.

## अमेरिकेंतील आयुर्विमा व्यवसाय

अमेरिकेंतील इन्स्टिटयूट ऑफ लाइफ इन्शुरन्स ह्या संस्थेनें १९५१ सालामधील आयुर्विमाव्यवसायाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. ह्या अहवालांत पुढीलप्रमाणें माहिती सांपडते.

अमेरिकेंत खाजगी विमा व्यवसाय करणाऱ्या ६०० कंपन्या असून बहुतेक अमेरिकन कुटुंबांनीं आपले विमे त्यांतूनच उतरलेले आहेत. १९५१ सालीं अमेरिकेंतील आयुर्विमा-पत्रकांची दर्शनी किंमत २५,३२०* कोटी डॉलर्स इतकी मोठी झाली. आयुर्विम्याच्या कामाचा हा उच्चांकच आहे. १९४५ सालापेक्षां ही किंमत १,०१,०० कोटी डॉलर्सनीं अधिक आणि १९४१ सालापेक्षां १,३१,०० कोटी डॉलर्सनीं अधिक आहे. १९५१ सालीं आयुर्विमा-पत्रकांची दर्शनी किंमत १,९०० कोटी डॉलर्सनीं वाढली. संस्थेचे अध्यक्ष मि. जॉन्सन ह्यांनीं १९५१ सालच्या अहवालांत असे विचार प्रदर्शित केले आहेत कीं अमेरिकेंतील आयुर्विमा व्यवसायांत लोकसंख्येच्या वाढीच्या मानानें अधिक वाढ झालेली दिसून येते. एकूण दर्शनी किंमत ज्याप्रमाणें वाढली आहे त्याचप्रमाणें विमेदारांची संख्याहि वाढलेली आहे. ही वाढ फक्त गेल्या दहाच वर्षांत झालेली नसून चालू शतकाच्या पहिल्या ५० वर्षांत हीच प्रवृत्ति दिसून येते. सध्यां अमेरिकेंत ८६ कोटी विमेदार आहेत व त्यांच्या मालकीचीं २०,९५,००,००० इतकीं विमा-पत्रकें आहेत. प्रत्येक विमेदाराच्या विमापत्रकाची सरासरी किंमत २,९०० डॉलर्स पडते. १९५१ सालीं अमेरिकन विमा-कंपन्यांनीं आपल्या विमेदारांना ४०० कोटी डॉलर्स हक्कपूर्तीदाखल दिले. हाहि एक उच्चांकच आहे. १९५० साल सोडलें तर १९५१ सालीं विमा पत्रकें विकत घेण्याचें प्रमाण बरेंच मोठें होतें. १९५० सालीं ३०६७ कोटी डॉलर्सचीं विमापत्रकें देण्यांत आलीं, तर १९५१ सालीं २८८० कोटी डॉलर्सचीं देण्यांत आलीं. १९४५ व १९४१ सालचे हे आकडे अनुक्रमें १४७८ कोटी व १२२६ कोटी डॉलर्स असे आहेत.

१९५१ सालीं विमापत्रकांच्या संख्येंत जी थोडीशी घट दिसून येते, तिचें कारण कामगारांच्या गटांना विम्याचे जे फायदे देण्यांत येत असत, त्यांच्यावर वेज स्टॅबिलायझेशन बोर्डानें घातलेल्या मर्यादा हें होय. हा गटांचा विमा सोडला तर इतर प्रकारच्या विम्याचा धंदा वाढलेलाच दिसून येतो. १९५१ सालीं विमा कंपन्यांची मालमत्ता ४५० कोटी डॉलर्सनीं वाढली. १९५१ सालीं त्यांची एकूण मालमत्ता ६८५० कोटी डॉलर्स इतकी झाली. खाजगी विमा-कंपन्यांकडून मिळणाऱ्या संरक्षणाशिवाय अमेरिकन कुटुंबांना सोशल सिक्युरिटी ॲक्ट, व्हेटरन्स ॲडमिनिस्ट्रेशन, रेलरोड रिटायरमेंट ॲक्ट आणि सिव्हिल सर्व्हिस रिटायरमेंट ॲक्ट ह्या कायद्यान्वयें सरकारी विमा-पत्रकांचें संरक्षण मिळूं शकतें. अशा विमा-पत्रकांत बरेच प्रकार आढळून येतात. अमेरिकेच्या चेंबर ऑफ कॉमर्सचें एक विमाखातें आहे. ह्या खात्यातर्फे असा अंदाज करण्यांत आला आहे कीं १९५२ सालअखेर वरील विविध प्रकारच्या विमा पत्रकांची किंमत सुमारें ३२,५०० कोटी डॉलर्स इतकी होईल. विमाव्यवसायाचा अमेरिकेंतील हा पसारा त्या राष्ट्राच्या इतर आर्थिक उलाढालीशीं सुसंगत असाच आहे. सर्व जगभर पसरलेल्या चलनवाढीची व महागाईची झळ कोरियन युद्धापासून अमेरिकेलाहि लागली आहेच. तरी सुद्धां विमाव्यवसायांत वाढ होतच आहे. ह्यावरून, अशाश्वसतेची भावना विमा-व्यवसायाला पोषक नसते ही रूढ कल्पना चुकीची ठरेल.

**वनस्पतींना सुद्धां ताप येतो**— ज्या वनस्पती आजारी असतात त्यांना माणसाप्रमाणेंच ताप येतो, असें कॅलिफोर्निआ विद्यापीठाच्या प्रो. यारवुड ह्या शास्त्रज्ञानें सिद्ध केलें आहे. निरोगी स्थितींत असणाऱ्या झाडांपेक्षां रोगी वनस्पतींचें उष्णतामान ०·१ ते २ सेंटिग्रेड डिग्री जास्त असतें, असा त्यांचा शोध आहे. वनस्पतींचें उष्णतामान त्यांनीं पानांच्या साह्यानें मोजलें.

**मद्रास सरकारच्या विमानांचा लिलांव**— मद्रास सरकारनें आपल्या मालकीच्या 'हनुमान' ह्या विमानाचा नुकताच लिलांव केला. लिलावांत फक्त तीन मागण्या आल्या आणि तें ७०,००० रुपयांना विकण्यांत आलें. हें विमान मद्रास सरकारनें १९४८ सालीं ३ लाख रुपयांना विकत घेतलें होतें. विमानांत ८ माणसें बसूं शकतात.

**भांडवलावरील नियंत्रणाचा कायदा**—भारतीय सरकारनें भांडवलाच्या उभारणीवरील नियंत्रणाच्या १९४७ च्या कायद्याची मुदत ता. ३१ मार्च, १९५६ पर्यंत वाढविली आहे. ही संघटना पैशाच्या दृष्टीनें स्वावलंबी करण्यासाठी भांडवल उभारणीच्या अर्जावर आतां फी आकारण्यास सुरवात करण्यांत आली आहे.

**गरजूंचा फायदा घेणारी ब्रिटिश टोळी**— ब्रिटनमध्यें सध्या रहात्या जागेचा व घरांचा तुटवडा आहे. त्याचा फायदा घेऊन मुद्दलांतच नसलेल्या जागांसाठी अगर घरांसाठी ठेवी घेऊन लोकांना लुबाडणारी एक टोळी ब्रिटनमध्यें थैमान घालीत आहे. ह्या टोळीच्या कारवाया इतक्या थराला गेल्या आहेत कीं स्कॉटलंड यार्डच्या प्रसिद्ध गुप्त-पोलिसखात्याच्या फसवणूक शाखेकडे त्या टोळीचा तपास लावण्याचें काम मुद्दाम देण्यांत आलें आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

स्थापना : १९३५

संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) | श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष) |
| श्री. न. ग. पवार | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. फ. दों. पदमजी | श्री. मा. वी. शहा |
| श्री. शं. ल. किर्लोस्कर | श्री. भा. म. गुप्ते |

### १९५१ सालांतील प्रगति

बँकेला गेल्या वर्षाचे व्यवहारांत इन्व्हेस्टमेंटच्या विक्रींतील रु. ७७,९२४ तोटा व स्टाफचे बोनससाठीं रु. १२,००० यांची तरतूद करूनहि रु. २,३९,६५० निव्वळ नफा उरला असून तो त्या मागील वर्षापेक्षां रु. १०,०४८ नें जास्त आहे.

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर

## रेल्वेजच्या कारभाराचा अहवाल (१९५०–५१)

भारतीय सरकारी रेल्वेचें १९५०–५१ मधील वाहतुकीचें एकूण उत्पन्न २६३·०१ कोटी रुपये म्हणजे १९४९–५० उत्पन्नापेक्षां २·६६ कोटी रुपयांनीं अधिक आहे. त्यापैकीं उतारूंच्या वाहतुकीमुळें ९७·८४ कोटी रुपये व मालाच्या वाहतुकीमुळें १४३·०१ कोटी रुपये मिळाले असून उरलेले २२·१६ कोटी रुपये इतर बाबींमुळें मिळाले आहेत.

या उलट, त्या वर्षातील सर्वसाधारण चालू खर्च १८०·२३ कोटी रुपये म्हणजे त्या मागील वर्षात झालेल्या खर्चापेक्षां १·३० कोटी रुपयांहून कमी झाला. घसारा फंडामध्यें ३० कोटी रुपये टाकण्यांत आले. घसारा फंडासाठीं काढून ठेवलेले ३० कोटी रुपये धरून सर्व खर्च भागवून ४७·५६ कोटी रुपये शिल्लक राहिले आहेत. ४७·५६ कोटी रुपये शिलकीपैकीं ३२·५१ कोटी रुपये मध्यवर्ती महसुलांत भरण्यांत आले. हे सर्व पैसे भरल्यानंतर ह्या वर्षातील निव्वळ शिल्लक १५·०५ कोटी रुपये राहिली. १९४९–५० मध्यें हीच रक्कम १४·५९ कोटी रुपये होती. यापैकीं १० कोटी रुपये विकास फंडासाठीं व ५.०५ कोटी रुपये महसूल संचय निधीसाठीं राखून ठेवण्यांत आले आहेत.

त्या वर्षात उतारूंची संख्या कोणत्याहि वर्षापेक्षां अधिक म्हणजे १३,०७७ कोटी होती, तर १९४९–५० मध्यें हाच आंकडा १२,५५२ कोटी होता.

ब्रॉड गेजवरील वाघिणींच्या वाहतुकीचें प्रमाण १९४९–५० मध्यें दर दिवशीं सरासरी ३८·१ मैल होतें तें वाढून ह्या वर्षात दर दिवशीं ३८·७ मैल पडलें. १९४९–५० मध्यें मीटर गेजवरील हें प्रमाण २९·७ मैल होतें, तें त्या वर्षात वाढून ३१·८ मैल पडलें. ब्रॉड गेजवरील दर वाघिणींचे दर दिवशींच्या टन–मैलाचें प्रमाण ४०२ वरून वाढून ४३४ झालें, तर मीटर गेजवरील हें प्रमाण १८० वरून १९० वर गेलें. ब्रॉड आणि मीटर गेजवर धांवणाऱ्या इंजिनांचें दर दिवशींच्या मैलांचें प्रमाणें फारच वाढलें होतें. परंतु उतारू आगगाड्यांच्या वक्तशीरपणांत मात्र बिघाड होऊन ब्रॉड गेजवरील हें प्रमाण ८१ टक्क्यांवरून घसरून ८० टक्के झालें व मीटर गेजवरील हें प्रमाण ७७ वरून ७३ टक्क्यांपर्यंत खालीं गेलें.

या वर्षात बंगळूर येथील हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट लि. नें बांधलेले तिसऱ्या वर्गाचे ६३ पोलादी बनावटीचे डबे रेल्वे मार्गावर धांवूं लागले. या वर्षात तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत ६,५२१ व इतरच्या डब्यांत ३,८०७ विजेचे पंखे बसविण्यांत आले.

सध्यां बांधण्यांत येणाऱ्या नवीन मार्गासुद्धां सर्व भारतीय रेल्वे मिळून ३१, मार्च १९५१ अखेर एकूण गुंतवलेलें भांडवल ८३८·१७ कोटी रुपये होतें. यांत भारत सरकारचे ८२७·०४ कोटी रुपयांचें भांडवल असून संस्थानें, रेल्वे कंपन्या व जिल्हा बोर्डे यांचया एकूण ११·१३ कोटी रुपये भांडवलाचाही समावेश आहे.

कांहीं किरकोळ कचेऱ्या, रेल्वे बोर्ड आणि सर्व रेल्वे यांत काम करणाऱ्या हंगामी आणि कायम नोकरवर्गाची एकूण संख्या ९,१९,७४७ होती. १९४९–५० मध्यें हीच संख्या ८,९६,१६६ होती. यांत बांधकामासाठीं लावलेल्या नोकरवर्गाचा समावेश केलेला नाहीं. भारत सरकारच्या नऊ रेल्वेबाबत लवाद मंडळानें दिलेल्या निवाड्यामुळेंच ओपन–लाईनवरील नोकरवर्गाच्या संख्येंत वाढ झाली.

### जर्मन उद्योगधंद्यांचें पुनरुत्थापन

अमेरिकेच्या काँग्रेसचें एक प्रतिनिधीमंडळ प. जर्मनीचा दौरा करून नुकतेच वॉशिंग्टनला परत गेलें. मंडळानें आपल्या अहवालांत पुढील मुद्यांचा समावेश केलेला आहे. अहवालांत असें नमूद करण्यांत आलें आहे कीं प. जर्मनीला बचावाची तरतूद करण्याची जरूर नसल्यानें जर्मन उद्योगधंदे पश्चिम युरोपांतील बाजारपेठांत आपलें बस्तान बसवूं लागले आहेत. त्यांच्या स्पर्धेमुळें ब्रिटन व फ्रान्स मागें पडूं लागले आहेत. प. युरोपमध्यें रासायनिक माल, धातु व धातूंचा माल ब्रिटन बऱ्याच मोठ्या प्रमाणावर विकत असे. परंतु आतां जर्मनीचा माल अधिकाधिक खपूं लागला आहे. १९४९ मध्यें ब्रिटननें जितका रासायनिक माल प. युरोपमध्यें निर्यात केला त्याच्या ६७ टक्के माल प. जर्मनीनें निर्यात केला होता, पण १९५१ मध्यें परिस्थितींत खूपच बदल झालेला आढळून आला. त्यावर्षी जर्मनीनें ब्रिटिश निर्यातीच्या मानानें २१० टक्के रासायनिक माल निर्यात केला. जर्मनीची स्पर्धा फक्त युरोपापुरतीच मर्यादित नसून तिचें क्षेत्र सर्व जगभर पसरलेलें आहे. ही परिस्थिति कायम आहे तोंपर्यंत प. जर्मनीला अमेरिकेकडून फारशी मदत मिळविण्याची जरूर नाहीं. प. जर्मनीचें आर्थिक, राजकीय आणि लष्करी एकीकरण शक्य तितक्या लवकर करण्यांत यावें, अशी शिफारस मंडळानें केली आहे. प. जर्मनी व प. युरोपांतील इतर राष्ट्रें ह्या एकीकरणाकडे जितक्या झपाट्यानें प्रगती करतील तितक्या प्रमाणांत त्यांना अमेरिकन मदत देण्यांत यावी, अशीहि सूचना मंडळानें केली आहे.

### कच्च्या मालाचा तुटवडा : ब्रिटनमधील औद्योगिक उत्पादन

गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमधील औद्योगिक उत्पादनांत ३% वाढ झाली. १९५० मध्यें १९४९ चे मानानें ८½% अधिक औद्योगिक उत्पादन झालें होतें. उत्पादन वाढीची गति कमी होण्याचें मुख्य कारण, कच्च्या मालाचा तुटवडा हें होय. औद्योगिक उत्पादनाचा इंडेक्स नंबर (१९४६=१००) १९४७ मध्यें १०८, १९४८ मध्यें १२१, १९४९ मध्यें १२९, १९५० मध्यें १४० व १९५१ मध्यें १४४ वर गेला. १९३५–३८ चे मानानें सध्याचें औद्योगिक उत्पादन ४० ते ४५% अधिक आहे. अमेरिकेला टिन व ॲल्युमिनिअम देऊन त्याचेकडून पोलाद घेण्याचा ब्रिटन–अमेरिका करार झाला आहे, त्यामुळें कच्च्या मालाच्या पुरवठ्याची परिस्थिति १९५१ अखेर थोडी सुधारली आहे. निर्गत व लष्करी मागणी ह्यांसाठीं उत्पादनास प्राधान्य देण्यांत येत आहे; सहाजिकच इंग्रजांना स्वतःला वापरण्यास जिन्नस मिळणें अधिकाधिक अवघड होत चाललें आहे. उदाहरणार्थ, १९५१ सालीं त्यांना १,१०,००० मोटार गाड्या उपलब्ध करून मिळाल्या; १९५२ मध्यें फक्त ६०,००० च मिळतील. बाकी सर्व उत्पादन निर्गत होईल.

**महात्मा गांधी बक्षीस**—वर्धा येथील राष्ट्रभाषा-प्रचार समितीतर्फे उत्कृष्ट साहित्यासाठीं एक बक्षीस दरवर्षी देण्यांत येत असतें. चालू वर्षीचें बक्षीस 'पुरुषार्थ'चे संपादक पं. सातवळेकर ह्यांना देण्यांत आलें आहे. हें मासिक सुरत जिल्ह्यांतील पारडी येथून दोन भाषांत प्रसिद्ध होत असतें.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०–६–५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,९९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. १–८–० | रु. २–११–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २–०–० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

( मिरज येथें १९१९ साली स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

## –मिरज–

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डुवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस ).

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर मॅनेजर

## ठेवी स्वीकारण्यांत येतात


ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

## पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay




## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.